ISSN 2231-1629 Knowledge Resonance

*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*

**IMPACT FACTOR 8.072**

# भारत-चीन संबंधाच्या पुनर्विचाराची गरज

**डॉ. संतोष संभाजी डाखरे**

*सहाय्यक प्राध्यापक*

*राजे विश्वेश्वरराव कला वाणिज्य महा. भामरागड*

*जि. गडचिरोली*

***सारांश***

*द्वितीय महायुद्धानंतर अमेरिकेने साम्यवादी रशियाची भीती ओळखून ' NATO' या संघटनेची स्थापना करून रशियाविरोधी देशांची मोट बांधली. त्याला प्रत्युत्तर म्हणून रशियाने अमेरिकेच्या विरोधात 'WARSAW PACT' गठित केला आणि जग अशा दोन गटात विभागल्या गेले. तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी कोणत्याही गटात सामील न होता अलिप्ततावादी धोरण स्वीकारले. नुकतेच मिळालेले स्वातंत्र्य आणि ब्रिटिशांनी लुटून, पोखरून ठेवलेल्या राष्ट्राची नव्याने उभारणी करणे आवश्यक होते. त्यामुळेच अशा गटबाजीत न पडता नेहरू यांनी अलिप्त राहणे पसंद केले. 1954 मध्ये भारत –चीन यांच्या दरम्यान पाच प्रमुख तत्वांवर आधारित करार झाला. हीच तत्वे 'पंचशील तत्वे' म्हणून ओळखली जातात. नेहरू नंतरचे अनेक सरकार आणि वर्तमान सरकारही चीनच्या संदर्भात याच पंचशील तत्वालाच केंद्रभूत मानून आपले ध्येयधोरण आखत आले आहे. मात्र चीनची वर्तणूक यातील एकाही तत्वाला अनुसरून नाही. हे परत एकदा सिद्ध झाले आहे. आजघडीला चीन महासत्ता म्हणून उदयास आलेला आहे. आशियात चीनला टक्कर देऊ शकणारा भारत हा एकच देश आहे, हे चीन ओळखून आहे. त्यामुळे भारतासोबत वारंवार सीमावाद उकरून काढून भारताला सीमेवरच गुंतवून ठेवण्याची चीनची रणनीती आहे. भारताची शक्ति व ऊर्जा ही सीमेवर लढण्यातच खर्च होत असल्याने इतर क्षेत्रातील विकासावर मर्यादा पडत आहे. अर्थसंकल्पातील मोठी रक्कम ही पाकिस्तान आणि चीन सीमा रक्षणावर खर्ची पडत आहे. आपल्याला टक्कर देण्याइतपत भारताला सशक्त बनू द्यायचे नाही, ही रणनीती चीनची आहे. या पार्श्वभूमीवर चिनसोबतच्या संबंधाचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. प्रस्तुत शोधनिबंधात याच मुद्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.*

***उद्देश***

*१. स्वतंत्र भारतापुढील आव्हाणांचा अभ्यास करणे.*

*२. भारतीय विदेशनीतीच्या तत्वांचा अभ्यास करणे.*

*३. चीनवर मात करता येईल अशा मुद्यांचा अभ्यास करणे.*

*मुळशब्द-*

*विदेशनीती, अलिप्ततावाद, पंचशील, सीमावाद, राष्ट्रीय सुरक्षा.*

**मुक्त विश्लेषण**

ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य बहाल केल्यानंतर भारतापुढे सर्वांगीन विकासाबरोबरच विदेश नीती ठरविण्याचे मोठे आव्हान होते. तत्कालीन जग अमेरिका आणि रशिया या दोन गटांमध्ये विभागल्या गेले होते. नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांना आपल्या कंपूमध्ये घेण्यासाठी दोन्ही देशांत चढाओढ सुरू होती. शितयुध्दास प्रारंभ झाला होता. ब्रिटिशांनी त्यांच्या सत्ताकाळात भारताला एक वसाहत म्हणूनच बघितले. शक्य होईल तेवढी लूट प्रत्येक क्षेत्रातून केली. त्यामुळे ब्रिटिशांच्या राजवटीत सर्व स्तरावर भारताची घडी पूर्णपणे विस्कटली होती. सामाजिक सुधारणेस प्रारंभ झाला असला तरीही गरिबी, कुपोषण, बेरोजगारी या समस्या भारतापुढे आ वासून उभ्या होत्या.

भारताला स्वातंत्र्य मिळाले या सोबतच विभाजनानंतर पाकिस्तानची निर्मिती झाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात एकत्रितपणे ब्रिटिशांविरोधात लढणारे हे दोन देश स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र एकमेकांचे कट्टर शत्रू झाले. विभाजना दरम्यानच दोन्ही देशात धार्मिक दंगली उसळल्या, हजारोंच्या कत्तली झाल्यात, लाखो बेघर झाले, प्रचंड वित्त हानी झाली दोन देशात युद्धही झाले. त्यामुळे भारताच्या शेजारी एका कट्टर शत्रूचा उदय झाला. चीनसोबत भारताचे प्रारंभी सलोख्याचे संबंध होते. मात्र 1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण करून भारताच्या विश्वासाला तडा दिला आणि भारताच्या शत्रूच्या यादीत आणखी एकाची भर पडली.

वर उल्लेख केल्याप्रमाणे अमेरिका आणि रशिया या दोन गटांमध्ये जगाची विभागणी झाली होती. मात्र भारताने कोणत्याही गटात सहभागी न होता अलिप्तवादाचा मध्यम मार्ग स्वीकारला. असे असले तरीही अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांसोबत भारताने समान पातळीवर सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले. गटातटात सामील झाल्यास एका विशिष्ट विचारधारेचा ठपका बसेल असाही विचार यामागे असावा.

राष्ट्रीय सुरक्षा हा समान उद्देश प्रत्येक देशाच्या विदेश नीती मध्ये निहीत असतो. भारतानेही विदेशी शक्तीपासून देशांच्या सीमा सुरक्षित ठेवण्याला प्राधान्य दिले आहे. शेजारी राष्ट्रांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करतानाच इतर राष्ट्रांसोबतही संबंध मजबूत करण्यावर भारताचा जोर राहिला आहे. सर्वच देशांशी मैत्रीपूर्ण संबंध हा भारताच्या विदेश नीतिचा आणखी एक उद्देश आपणास प्रकर्षाने जाणवतो. याच अनुषंगाने भारताने चीनसोबत व्यापक सहकार्य, बंधूभावावर आधारित पंचशील करार केला होता. मात्र चीनने भारतावर आक्रमण करून या कराराची हवा काढून घेतली. या प्रसंगापासून धडा घेऊन चीनविरुद्ध आक्रमक विदेशनीतीची आखणी गरजेची होती, मात्र तत्कालीन नेतृत्वाने तसे केले नाही.

पाकिस्तान संदर्भात मात्र प्रारंभी पासूनच भारताची विदेश नीती ही आक्रमक असल्याचे दिसून येते. 1971 मध्ये बांगलादेश मुक्तीसंग्रामाच्या वेळेस इंदिरा गांधींच्या नेतृत्वात याची झलक बघावयास मिळते. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात 1999 मध्ये झालेल्या कारगिल युद्धातही अशाच स्वरूपाच्या आक्रमक धोरणामुळे पाकिस्तानला पराभव पत्करावा लागला होता. अलीकडील काळातील पाकव्याप्त काश्मीरमधील सर्जिकल स्ट्राइकच्या माध्यमातूनही भारताने पाकिस्तानला धडा शिकविल्याचे दिसून येते.

असे असले तरीही आंतरराष्ट्रीय स्तरावर एक बलाढ्य व सशक्त राष्ट्र म्हणून ओळख निर्माण करण्यात भारत कुठेतरी कमी पडत असल्याचे चित्र आहे. आशिया खंडात चीनचा बाहुबली म्हणून होत असलेला उदय, हिंद महासागरातील त्याचा दबदबा, अमेरिकेसारख्या महासत्तेलाही भीक न घालण्याची त्याची प्रवृत्ती, सीमेवरील भारताशी उकरून काढलेला वाद, पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानच्या सहकार्यातून सुरू असलेले विकास कार्य, कश्मीर मुद्यावर पाकिस्तानचे समर्थन नव्यानेच अफगाणिस्तानात सत्तेत आलेल्या तालिबानशी मैत्रीपूर्ण व्यवहार, श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश या देशांना दिलेले भरमसाठ कर्ज या माध्यमातून चीन अधिक सशक्त होत असून भारतासाठी ते धोकादायक आहे. या पार्श्वभूमीवर भारताला आपल्या विदेश नीतिची पुनर्रचना करण्याची गरज आहे.

आपल्या परराष्ट्र नीतीमध्ये शांती, अहिंसा हे तत्व राहीलच मात्र हे फक्त त्या राष्ट्रांसाठी जे या तत्वांना मानतात. चीन, पाकिस्तानसारख्या विश्वासघातकी राष्ट्रांसाठी ‘आक्रमक’ व ‘जशास तसे’ हे धोरण यापुढे अवलंबिणे गरजेचे आहे. मागील वर्षी गलवानमधील चीनच्या एका हल्ल्याने पाकिस्तानपुरस्कृत भारतावरील रोजचे दहशतवादी हल्ले हे कधीच मागे पडले असून चिनच खरा धोकादायक आणि तोच आपला ‘शत्रू नंबर एक’ असल्याची प्रचिती आली आहे. त्यामुळे आता चीनला धडा शिकवणे गरजेचे आहे. आजपर्यंत आपण जागतिक मंचावर कधीच चीनचा खुला विरोध केला नाही. भारताच्या समर्थनामुळेच UNO आणि WTO मध्ये चीनला सहभाग मिळाला. चीनमधील नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी असो वा मानवाधिकाराचे सर्रास उल्लंघन असो, आपण सदैव चुप्पी साधली आहे. आपल्या याच चांगुलपणाची फळे आपल्याला भोगावी लागत आहे. मात्र आता जागतिक मंचावर चीनचा विरोध करणे गरजेचे आहे.

चीनच्या शेजारी असलेल्या तैवानला चीन कट्टर शत्रू मानत असतो. या दोघांमधून विस्तव सुद्धा जात नाही. तैवान हा आपलाच प्रदेश असल्याचा चीनचा कांगावा आहे. चीनमुळेच तैवानला स्वतंत्र देश म्हणून युनोची मान्यता मिळत नाही. त्यामुळे ‘शत्रूचा शत्रू तो आपला मित्र’ समजून भारताने तैवानच्या स्वातंत्र्याला युनोमध्ये समर्थन केल्यास चीनचा तळफळाट होणार, सोबतच चीनला डावलून तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रगत असलेल्या तैवानसोबत विविध पातळीवर करार केल्यास चीनला अद्दल घडेल आणि अब्जो रुपयांच्या भारतीय गंगाजळीला मुकावे लागेल. सध्या आपण चीन नाराज होऊ नये म्हणून तैवानसोबत फारसा व्यवहार करत नाही. या संदर्भातही विचार होणे गरजेचे आहे. दक्षिण चिनी महासागराला चीन आपली मक्तेदारी समजतो. एखाद्या देशाच्या सीमेला समुद्र किंवा महासागर लागून असेल तर सीमेपासून विशिष्ट अंतरापर्यंतच्या समुद्री भागावरच संबंधित देशाची मालकी असते. तेवढाच

परिसर आर्थिक विकासाकरिता तो वापरू शकतो. चीन मात्र अशा कोणत्याही नियमांना जूमानत नाही. पूर्ण दक्षिण चिनी समुद्र आपलाच असल्याच्या अविर्भावात वावरतो. या परिसरात असणाऱ्या मलेशिया, फिलिपिन्स, व्हिएतनाम, ब्रूनेई सारख्या देशांना चीन धमकावीत असतो. आकारमानाने छोटे असलेले हे देश चीनची दादागिरी मुकाट्याने सहन करतात. या देशांच्या मागे भारत जर खंबीरपणे उभा राहिला, त्यांना बळ दिले तर निश्चितच चीनच्या दादागिरीला चाप बसेल आणि पेट्रोलियम, नैसर्गिक वायू व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या या दक्षिण चिनी सागरात भारताचा प्रभाव वाढेल.

गलवान खोरे, दौलतबेग ओल्डी, लडाख परिसरात पायाभूत विकासाच्याअंतर्गत भारताने जे रस्त्यांचे काम हाती घेतले आहे, तीच चीनची खरी डोकेदुखी आहे. रस्त्यांच्याद्वारे भारतीय सैन्यांना या पहाडी भागात संचार करणे सुलभ होणार आहे आणि चीनला तेच नको आहे. मात्र याच चीनने आपल्या परिसरात असे मोठ-मोठे रस्ते कधीचेच बनवून तयार केले आहे. या रस्त्यांच्याद्वारेच चिनी सैन्यांना प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपर्यंत सहज पोहोचणे शक्य होत असते. मोठ-मोठे पहाड, दऱ्या-खोऱ्या आणि बर्फाच्छादित प्रदेशामुळे या भागात 20-25 किलोमीटर रस्ते तयार करण्यासाठीही कित्येक वर्ष लागत असतात. त्यामुळे भारताने या परिसरात सुरू केलेले कार्य चीनच्या कोणत्याही दबावाला बळी न पडता सुरू ठेवणे गरजेचे आहे. कारण हेच रस्ते भविष्यात भारतीय सैन्याला महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

चिनी वस्तूंवर निर्भर असलेल्या भारताला 'आत्मनिर्भर' बनवायचे असेल तर स्वदेशी कंपन्यांना सर्वच पातळीवर बळ देण्याची गरज आहे. गुणवत्ता व किंमत या आधारावर भारतीय वस्तू चिनी वस्तूंची बरोबरी करायला लागेल तेव्हा निश्चितच भारतीयांचे 'चीनवरील अवलंबित्व' कमी होईल. त्यादृष्टीने मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया या संकल्पनांचा निव्वळ गाजावाजा करण्यापेक्षा त्या प्रत्यक्षात कशा उतरतील यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील चिनी कंपन्यावर मोठे निर्बंध लादण्याचे सूतोवाच भारताने केले आहे. अनेक चीनी ॲपवर बंदी लादून चीनला चपराक दिली आहे. अनेक चिनी कंपन्यांसोबत असलेले करारसुद्धा रद्द केले आहे. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (LAC) मोठ्या प्रमाणात सैन्य, लढाऊ विमाने व लष्करी वाहने तैनात करून कोणत्याही आव्हानास सज्ज असल्याचा इशारा भारताने चीनला दिला आहे. हे भारताची परराष्ट्र निती बदलाचे संकेत आहे. मात्र एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता जागतिक पातळीवर चीनविरोधी राष्ट्रांची मोट बांधून त्याला एकटे पाडण्याचा कार्यक्रमही आखावा लागणार आहे.

**समारोप**

भारताला भविष्यात पाकिस्तानपेक्षाही चिनपासूनच मोठा धोका आहे. हा धोका टाळण्यासाठी भारताला बलाढ्य राष्ट्रांची मदत घेणे गरजेचे ठरणार आहेत. एकट्याने चीनचा सामाना करणे भारताला कदापि शक्य नाही, हे मान्यच करावे लागेल. भविष्यात कधी चीनने भारतावर आक्रमण केलेच तर आपल्या बाजूने रणांगणावर उतरणारे दोन चार देश सोबत असणे गरजेचे आहे. भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व जपान या चार देशांच्या QUAD या संघटनेची स्थापना झाली असली तरीही त्याचा धाक मात्र म्हणावा तसा चीनवर पडला नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे चीन दबावात येईल अशी कृती या संघटनेकडून अपेक्षित आहे. भारताने या संदर्भात पुढाकार घेणे गरजेचे आहे. चीनसंदर्भात मिळमिळीत धोरणाला तिलांजलि देऊन आक्रमक रणनीतीची आखणी करणे गरजेचे आहे.

**संदर्भ**

1. डॉ. चंद्रशेखर दिवाण, 'भारताची विदेशनीती' विद्या प्रकाशन नागपूर
2. Neville Maxwell, Indias China War, London: Jonathan Cape,1970
3. Mohan Guruswamy and Zorawar Singh, India China Relations, The border Issue and beyond, New Delhi. 2009
4. www.stockhome international peace research institute.com
5. www.indian foreign policy. com
6. The Hindu newspaper. (Date -17/06/2020)